# वर्तुळ

आठवते जमेल तसे,

आणि लिहित रहाते येता-जाता,

माहीत असते -
लिहून झाल्यावर, तू घेतोसच
वाचायला...
आणि फिरवू लागतोस डोळे,
त्यातल्या एकेक शब्दावरून....

त्याच वेळी मग मी पण,
वाचायला लागते तुझे डोळे...

कधी भरून येणारे,
कधी हसून बहरणारे,
कधी उदास उसासणारे,
कधी भकास-पोकळ दिसणारे,
कधी रक्त ओकणारे,
कधी प्रेम फुलवणारे...
...............................
आणि मिळत जातो मला विषय,
नव्या एका कवितेचा.
परत आठवते तुझे डोळे..
आणि लिहित रहाते येता-जाता...
............................
एक - एक वर्तुळ पूर्ण करत !!

**- प्रीती देशपांडे**

**http://www.meetipreeti.com/**